नियमित फौजदारी खटला क्र. ८६/२०२०
नि. क्र. ३०

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक –३ मी शपथपूर्वक सांगतो कि –</u>**

**माझे नाव –** दुल्सीन सालु फर्नांडीस
**वय** – ५८ वर्षे **धंदा** – गृहिणी
**राहणार –चराठा, नमसवाडी, ता. सावंतवाडी**

**<u>सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. जी. एन. पाटोळे यांचेतर्फे –</u>**

१. वर नमुद पत्त्यावर मी, माझी मुलगी लविना, मॅकलेट असे एकत्रात रहातो. माझे पती कामानिमित्त बाहेरगांवी रहातात. आरोपी माझ्या घराशेजारी रहातो. घटना दिनांक ९/१०/२०२० रोजी सकाळी ७.३० वाजता घडली होती. त्यावेळी मी व माझी मुलगी लविना गुरांना चरवण्यासाठी मढ याठिकाणी घेवून गेलो होतो. गाईला चरवल्यावर लविना गाईला बांधण्यासाठी दांडा पुरत होती. त्यावेळी आरोपी तेथे आला. त्याने इशाऱ्याने लविनाला तेथे दांडा पुरु नको असे सांगितले. त्याने लविनाला धक्काबुक्की करुन खाली पाडले व हाताने तिच्या उजव्या गालावर थापट मारली. आरोपीने लविनाला केस पकडून खाली पाडले. आरोपीने लविनाच्या उजव्या मांडीवर दांड्याने मारुन तिला दुखापत केली. त्यामुळे ती आरडाओरडा करु लागली. मी धावत जावून तिला सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आरोपीने मला मारण्याचा प्रयत्न केला. आरोपीने माझ्या अंगावर दांडा उगारला, परंतु मी त्याचा वार चुकवला. त्यानंतर आम्ही घरी निघून गेलो. लविनाने घटनेबाबत मॅकलेटला सांगितले. त्यानंतर मॅकलेट व लविना तक्रार देण्यासाठी पोलिस स्टेशनला गेले. आरोपीने ज्या दांड्याने लविनाला मारहाण केली तो दाखवल्यास मी ओळखू शकते. आता मला दाखविण्यात आलेला दांडा आर्टीकल 'अ' हा तोच आहे. आरोपीला दाखविल्यास मी ओळखू शकते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस. बी. कोलगांवकर यांचेतर्फे –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्यामध्ये जमिनीवरुन वाद चालू आहेत. पोलिस माझ्याकडे आले व त्यांनी माझे टिपण नोंदवले असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे आहे

की, मी आज रोजी माझ्या मर्जीने जबाब दिला आहे. मी साक्षीसाठी येण्यापूर्वी माझे टिपण वाचले नाही. पोलिसांनी अभिलेखावर माझे जे टिपण दाखल केले आहे त्याबाबत मला काही सांगता येणार नाही. पोलिसांनी माझा जबाब घेतेवेळी मी त्यांना ''त्यावेळी मी व माझी मुलगी लविना गुरांना चरवण्यासाठी मढ याठिकाणी घेवून गेलो होतो, गाईला चरवल्यावर लविना गाईला बांधण्यासाठी दांडा पुरत होती, त्यावेळी आरोपी तेथे आला, ती आरडाओरडा करु लागली'' हा मजकुर सांगितला होता. परंतु सदर मजकुर पोलिसांनी माझ्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकुर मी पोलिसांना सांगितला नसल्यामुळे पोलिसांनी तो माझ्या जबाबात नमुद केला नाही. मी पोलिसांना जबाब देताना 'आमचे आज सुमारे दहा वर्षे होतील तेव्हापासून बोलाचाली नाही, परंतु किरकोळ शिवीगाळ चालू असते' हा मजकुर सांगितला होता.

३. घटनास्थळावरील जमीन आमच्या मालकीची नाही. बांबुचा दांडा जमिनीत पुरला तर त्याला माती लागेल. आर्टीकल 'अ' वरील दांड्याला माती लागलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल 'अ' सारखा दांडा गांवात सगळीकडे मिळतो. आर्टीकल 'अ' वरील दांडा घटनेवेळचा आहे हे ओळखण्याकरीता त्यावर दांडा तिरकस कापलेला आहे. आर्टीकल 'अ' वरील दांडा मी व माझ्या मुलीने पोलिसांना दिला होता. सदर दांडा आमच्या वापरातील नाही. आर्टीकल 'अ' सारखे दांडे आम्ही कुंपणासाठी कापून आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल 'अ' हा त्यातीलच एक दांडा आहे.

४. घटना १५ मिनीटे चालली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजुला रस्ता आहे व त्यावर लोकांची ये-जा चालू असते. घटनेनंतर सकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास आम्ही आमच्या घरी आलो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी व माझ्या मुलींनी तक्रार देण्याचे ठरवले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला गुन्ह्यात अडकावण्याचे आम्ही ठरवले. आम्ही पोलिस स्टेशनला किती वाजता गेलो हे मला आठवत नाही. दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास

आम्ही पोलिस स्टेशनमधून घरी आलो. हे म्हणणे खरे आहे की, मुलीला मदत होण्यासाठी मी आज रोजी साक्ष देत आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या आईने माझ्याविरुध्द दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये न्यायालयाने आमच्याविरुध्द ताकीद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिन आम्हाला मिळावी अशी आमची इच्छा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने दाखल केलेल्या दावा जमिनीशी आमचा काही संबंध नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या मुलीला हाताने व दांडयाने मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला ढकलून दिले व दांड्याने मारण्याचा प्रयत्न केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी मी गुरे चारण्यासाठी गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जमिन आम्हाला मिळावी याकरीता आम्ही आरोपीविरुध्द खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल 'अ' वरील दांडा गुन्ह्यावेळी आरोपीने वापरल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
(जे.एम.मिस्त्री)
न्यायदंडाधिकारी वर्ग-१ सावंतवाडी.

दि. १६/०३/२०२६